# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.विशेष स्थायी समिती सभा दि.१३/०५/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवारदिनांक१३/०५/२०१६ रोजी सभा सुचनाक्र.०२दि.१२/०५/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमयकरण्यासाठीमिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी १०.०० वा. सभा आयोजितकरण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. प्रशांतएन. केळूसकर | सदस्य |
| ३. | श्री. नरेशतुकाराम पाटील | सदस्य |
| ४. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ५. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ६. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ७. | श्री. शरदकेशव पाटील | सदस्य |
| ८. | श्री. दिनेशतेजराजजैन | सदस्य |
| ९. | श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| १०. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ११. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टिवनजॉन मेंडोन्सा | सदस्य |
| २) | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ३) | श्री. रविंद्रभिमदेव माळी | सदस्य |
| ४) | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५) | ॲड रवि व्यास | सदस्य |

मा. सभापती :-

सचिवांनी सभेच्याकामकाजाला सुरूवातकरावी.

नगरसचिव :-

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येतेकी, मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडीलक्रमांक एमसीसी-२०१६/प्र.क्र.२३७/२०१६/३३, दि. १२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शुक्रवारदि. १३/०५/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजतामिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्थायी समिती, सभापतीदालनात स्थायी समिती सभा सुचनाक्र. ०२, दि. १२/०५/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवरविचारविनिमयकरण्यासाठी आयोजितकरण्यांत येत आहे. प्रकरणक्र. ७, पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामाच्यानिविदेतीलदरास मंजूरी मिळणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

प्रशासनानेदिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकाक्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामीजे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन व मजुरइत्यादी पुरवठाकरणेकामी वाटाघाटीकरुन मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकपंनी या निविदाकारानेखालीलप्रमाणेदरकमीकेलेले आहेत.

| Type of Machinery, Equipment & Manpower | मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकंपनी यांचे वाटाघाटीनंतरकमीकेलेलेदर |
|---|---|
| POCLAIN MACHINE - 200 | 2087/- प्रतीतास प्रती मशिन |
| POCLAIN MACHINE WITH BOAT | 2360/- प्रतीतास प्रती मशिन |
| JCB MACHINE | 1143/- प्रतीतास प्रती मशिन |
| DUMPER | 6378/- प्रती शिफ्ट प्रतीडंपर |

| | |
|---|---|
| TORAS | 9337/- प्रती शिफ्ट प्रती टोरस |
| HAYDRA MACHINE | 1187/- प्रतीतास प्रती मशिन |
| CRAINE MACHINE | 4720/- प्रतीतास प्रती मशिन |
| MAN POWER | 115.50 प्रतीतास प्रती मजुर (रु. 924/- प्रती मजुर प्रती08तास) |

वरीलप्रमाणे मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकंपनी यांनी वाटाघाटीनंतर सादरकेलेल्या दरास ही सभा मंजुरीदेत आहे.

दिनेशजैन :-

माझे अनुमोदन आहे.

सुहास रकवी :-

ह्या दरामध्ये वाटाघाटीकरताना पावसाळ्यापूर्वी नालेसफाई कामाच्यानिविदेच्यादरात मंजूरी मिळणेबाबत. ह्या विषयावर मशिनरीचाजो रेटगेल्यावर्षीचा रेट दिला आहे किंवाग्लोबल मॅनेजमेन्ट काय रेट देतोत्या रेटनीत्यांनादेण्यात यावे.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

जेनेगोशिएशनकेलेतेचदरनिविदेमध्ये आहे त्याच्यावर चर्चा करता येते बाहेरच्या रेटवर चर्चा करता येत नाही.

सुहास रकवी :-

कूठल्या.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

कूठलेही रेट.

वेंचर मेंन्डोन्सा :-

साहेब, तुम्ही काय बोलता आमच्या समोर रेटकशाला आणले.

संभाजी पाणपट्टे(मा. उपायुक्त ):-

निविदेत आहे ते बोलतो.निविदेतजेदर आलेत्यांच्यावरनिर्णय घ्यायचा असतो.ह्याला द्यात्यालाद्या असेनसते.

वेंचर मेंन्डोन्सा :-

आम्ही मानत नाही तोतुमचा प्रॉब्लेम आहे आमचा नाही.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

निविदेतदर आहेत त्यांच्यावर चर्चा करण्यात यावी.

सुहास रकवी :-

निविदेच्यादराला आमची हरकत असेलतर तुम्हाला प्रॉब्लेम आहे.कारण आम्ही पूर्ण अभ्यास करूनविचारपूर्वकनिर्णयघेऊ.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

तुमचे मत मांडू शकता.

सुहास रकवी :-

आमच्या सुचना आहेत जोजे.सी.बी. रेट आपण बाहेर ६५० ला घेतोत्याचा रेट तुम्ही १२२१ रू. लावला आहे.टॅक्सेशन पकडून ८०० रू. ठीक आहे. हे १२०० कशाला लावता.

वेंचर मेंन्डोन्सा :-

१००० रू.पकडा १२०० कशाला म्हणता.

सुहास रकवी :-

सर्व टॅक्स पकडून १००० रू. ठीक आहे. आमची सुचना आम्ही सर्व सदस्यांच्या वतीने मांडतो सदर पावसाळ्यापूर्वी नालेसफाईच्या कामाच्यानिविदेतीलदरदिले आहेत त्याच्यातजे.सी.बी. आम्ही हे केले आहेत त्याच्यानंतरडंपर,टॉरस ९९७१ आपणजे बाहेर रेट आहेत त्याची आणि ह्याची तफावत बघीतलीका? त्याच्यात काही निगोशिएटकेले आहेत का मग रेट कुठे आहेत.

प्रशांत केळुसकर :-

रेटदिले आहेत.

सुहास रकवी :-

ह्याच्यातदिले नाहीत.

संभाजी पाणपट्टे(मा. उपायुक्त ):-

गोषवा-यामध्ये आहेत.

सुहास रकवी :-

साहेब तुम्ही किती प्रमाणातकमीकेले.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

गेल्यावर्षीपेक्षा १० टक्के वाढवूनदिले आहेत.

सुहास रकवी :-

१२०० रू. म्हटल्यावरत्याच्यात आपल्याला रेट कमीकरायला लागतील.

प्रशांत केळुसकर :-

गेल्यावर्षीचा जो रेट होता त्याच्यामध्येनिविदेत वाटाघाटीकेलेली आहे. हे जेदर वाढवूनदिले म्हणजे तुम्ही जेव्हा निविदा सादरकेलीत्या टायमालादर १०% वाढवून सादरकेली.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

हो.

प्रशांत केळुसकर :-

त्याच्यानंतरत्यांनीनिविदा भरली.

संभाजी प्पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

हो.

प्रशांत केळुसकर :-

त्याच्यामध्ये तुम्ही ३%कमीकेले.गेल्या वर्षी १०% आले.तुम्ही ३%कमीकेले. म्हणजे गेल्यावर्षी ७% वाढ झाली.

शरद पाटील :-

गेल्या वर्षापेक्षा ३%जास्तदिले.

सुहास रकवी :-

गेल्यावर्षी दिलेल्या मंजूरदराच्यात्या मंजूरदराला १०% वाढवलेकीतुमच्या प्रमाणे १०% वाढवले.

प्रशांत केळुसकर :-

मंजूरदराप्रमाणे.

सुहास रकवी :-

गेल्यावर्षी मंजूरदराचेकिती बिल झाले.

प्रशांत केळुसकर :-

बजेटमध्येतरतूद आहे तेवढेचकरायला लागणार आहे. आपण बजेटच्यातरतूदी प्रमाणेच मंजूरीदेणार.

सुहास रकवी :-

नालेसफाई कधीपर्यंत संपणार आहे.

संभाजी पाणपट्टे (मा. उपायुक्त ):-

१५-२० दिवसजातील.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर. सुचना फेटाळण्यात येत आहे.

प्रकरणक्र.०७ :-

पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामाच्यानिविदेतीलदरास मंजूरी मिळणेबाबत.

ठरावक्र.०७ :-

प्रशासनानेदिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकाक्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामीजे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन व मजुरइत्यादी पुरवठाकरणेकामी वाटाघाटीकरुन मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकपंनीया निविदाकारानेखालीलप्रमाणेदरकमीकेलेले आहेत.

| Type of Machinery, Equipment & Manpower | मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकंपनी यांचे वाटाघाटीनंतरकमीकेलेलेदर |
|---|---|
| POCLAIN MACHINE - 200 | 2087/- प्रतीतास प्रती मशिन |
| POCLAIN MACHINE WITH BOAT | 2360/- प्रतीतास प्रती मशिन |
| JCB MACHINE | 1143/- प्रतीतास प्रती मशिन |
| DUMPER | 6378/- प्रती शिफ्ट प्रतीडंपर |
| TORAS | 9337/- प्रती शिफ्ट प्रती टोरस |
| HAYDRA MACHINE | 1187/- प्रतीतास प्रती मशिन |

| | |
|---|---|
| CRAINE MACHINE | 4720/- प्रतीतास प्रती मशिन |
| MAN POWER | 115.50 प्रतीतास प्रती मजुर(रु. 924/- प्रती मजुर प्रती08तास) |

वरीलप्रमाणे मे. आशापुराकंन्स्ट्रक्शनकंपनी यांनी वाटाघाटीनंतर सादरकेलेल्या दरास ही सभा मंजुरीदेत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. दिनेशजैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-
सभा संपली असे जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ सकाळी११.२५ वाजता)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

